

अच्युत गोडबोले
सुलभा पिशवीकर

सारंग

'सारंग' हे नावच किती नादमय आहे! सारंग हे एका पक्ष्याचंही नाव आहे. सारंग म्हणजे नावाडीही. का कुणास ठाऊक, पण सारंग आठवला की ती 'पहुडलेली' दुपार आणि त्यातली लग्नाची पंगतच आठवते. सारंग तसा बऱ्यापैकी जुना आणि लोकप्रिय राग आहे. भक्त कबीर, सूरदास, नामदेव या मंडळींबरोबर गुरू नानकदेव यांनीही 'ग्रंथसाहेबा'मध्ये (पान १२५१-५४) या रागात खूप रचना करून ठेवल्या आहेत. अब्दुल करीम खाँसाहेबांनीही सारंगचं रेकॉर्डिंग १९०५ साली केलं होतं!

उन्हाळ्यातली रणरणती दुपार! जुनी पडकी उद्ध्वस्त धर्मशाळा! तिच्या कौलांवर बसून 'एकांत गीत' गाणारा पारवा! झाडावर कुठे तरी दिसणारा एक पक्षी, नदीत कुठे तरी चाललेली एक होडी. नाइलाजानं प्रखर उन्हात दगडावर घाव घालणारी, लहानग्याला पाटीखाली ठेवून पायाला पाला बांधून कष्टणारी दया पवारांच्या कवितेतली श्रमिक स्त्री! अशा रखरखत्या दुपारी वाऱ्यांच्या हळुवार झुळुकेनं फुंकर घालावी, असे 'सारंग'चे सूर वाटतात.

'सारंग'चे अनेक प्रकार आहेत. बिंदराबनी, मधमाद, शुद्ध, गौड हे त्यातल्या त्यात लोकप्रिय असे. याशिवाय बडहंस, लंकादहन, मियाँ की, नूर वगैरेही प्रकार आहेत.

'बिंदराबनी' किंवा 'वृंदावनी' सारंग हे नाव वृंदावन या ठिकाणावरून पडलं असावं. हिराबाई बडोदेकर या रागात 'मधुमदन मन करो' अशी झपतालातली बंदीश गात. तार षड्ज आणि त्यालगतचा शुद्ध निषाद या हिराबाईंच्या खासियतीमुळे ही चीज खूप रंगायची. भीमसेनजींनी त्यांच्या कॅसेटमध्ये हीच चीज गायलीय. 'ना बोलो श्याम हमी संग' ही जलद त्रितालातली लटक्या रागाची लाडिक बंदीशही या रागात आहे. पाडगावकरांचं 'भातुकलीच्या खेळामधली राजा आणिक राणी' हे गाणं, 'बाळा जो जो रे' हे अंगाईगीत, मत्स्यगंधा नाटकातलं 'साद देति हिमशिखरे' हे नाट्यपद किंवा 'जादूगर सैंया छोडो मोरी बैंया' किंवा 'सावन आये या ना आये' ही हिंदी गाणी याच रागातली.

सारंगचे बिंदराबनी आणि मधमाद हे दोन प्रकार मानायचे की नाही, यावर पुन्हा वाद आहेत. बिंदराबनीत दोन निषाद घ्यायचे की एकच, वगैरेंविषयी अखिल भारतीय संगीत परिषदेच्या अधिवेशनात बराच काथ्याकूट झाला आणि हे दोन प्रकार वेगळे मानायचा चक्क एक ठराव पास झाला. बिंदराबनी दोन निषाद घेऊन गायचा, असंही मग ठरलं. त्यातला तीव्र निषाद दुपारच्या दाहकतेची जाणीव करून देणारा तर कोमल निषाद आणि मध्यम त्या दाहकतेवर फुंकर घालणारे. आरती प्रभूंच्या ओळी आठवतात-

'कुणाला सांगू नये
याही ओंजळीत फुले होती
त्यांनाही भूल पडली होती
कोमेजून जाता जाता...'

यात फुलांचं कोमेजलेपण आहे पण कोमेजण्यासाठी मुळात ओंजळीत फुलं आहेत. सारंग तसाच आहे. तो शुष्क नाही. त्यात भूल पाडणारा फुलांचा गंध आणि नाजूकपणा भरला आहे.

मधमाद म्हणजेच 'मध्यमादी' सारंग हे एक गोडच प्रकरण आहे. 'मेघ' या मल्हार कुळातल्या रागाचे सूर तेच असल्यानं त्यापासून मधमाद सारंगला वेगळं ठेवण्यात कौशल्य लागतं. यात शुद्ध निषाद नसल्यानं आणि त्यातल्या हळुवारपणामुळे रागाचं वातावरणही वेगळंच आहे. सूर्य माथ्यावर आला तरी घनदाट जंगलात, राईत हितगुज करणाऱ्या प्रेमिकांना त्याचं अस्तित्व जाणवू नये, असंच याचं वातावरण! माणिक वर्मा, वीणा सहस्रबुद्धे, जसराज आणि किशोरी आमोणकर यांचे मधमाद सारंग सुंदर चित्र उभं करतात. जरूर ते ऐकावेत. बिसमिल्ला खाँसाहेबांची या रागातली सनईही सुंदर आहे. मुकेशचं 'आ लौटके आजा मेरे मीत' हे गाणं याच रागातलं!

सोज्वळ प्रेम आणि भक्तिरस व्यक्त करणारा राग म्हणजे शुद्ध सारंग. केशवराव भोळे याच नावानं मौजेत १९४४-४५ मध्ये 'आवाजाची दुनिया' ही लेखमाला लिहीत. संस्कृत ग्रंथांमध्ये याचा उल्लेख फक्त 'सारंग'. असाच केलाय. "काठियावाडात पूर्वी एका गायकानं दोन मध्यमांचा सारंग गायला. त्याचं नाव त्यानं 'शुद्ध सारंग' असं सांगितलं, तर फक्त तीव्र मध्यमाचा सारंग गाऊन त्याचं 'नूर सारंग' असं नाव सांगितलं," असं भातखंड्यांनी लिहून ठेवलंय. शुद्ध सारंगमध्ये 'जा रे भवरा दूर' ही प्रसिद्ध बंदीश आहे. बडे गुलाम अली तर त्यांची 'बेठी दरसवा तोहे सजनवा' ही लालित्यपूर्ण बंदीश खूपच सुंदर गात. अमजाद अली खाँ, श्रुती सडोलीकर, उल्हास कशाळीकर, जसराज, हरिप्रसाद यांच्याही या रागातल्या रचना जरूर ऐकाव्यात. 'निर्गुणाचे भेटी आलो सगुणासंगे' हा रामदास कामत यांनी गायलेला अभंग याच रागातला आहे. किंवा 'मधुरा बिंबाधरा', 'शूरा मी वंदिले', 'सखी तू दिव्य रूप मैथिली', 'तारील तुज अंबिका' ही नाट्यपदं / गाणी स्वत:शीच गुणगुणावीत. या रागाशी बरंच साम्य सापडेल. मेहेंदी हसननं गायलेली गालिबची 'दिले नादां तुझें हुवा क्या है' ही गझलही ऐकावी. ही गझल तर ग्रेट आहेच, पण ती गायलीयपण तितकीच लाजबाब!

'मियाँ की' सारंग हा तसा अप्रचलित राग. तानसेन घराण्याचे बजीर खाँ चांगला गात असत, असं सांगतात. 'मियाँ' तानसेनानंच तो निर्माण केला असावा. 'लंकादहन सारंग' हनुमानानं लंका दहनप्रसंगी चक्क गायल्याचीपण एक आख्यायिका आहे! लोचनाच्या 'तिरंगिणी'मध्ये 'लंकादहन सारंगा'चा उल्लेख सापडतो. 'मियाँकी सारंग'चे उल्लेख मात्र फारसे मिळत नाहीत.

'गौड सारंग'ला सारंग का म्हणायचं, हे गौडबंगालच आहे. खरा तर याचा ओढा 'छायानट', 'कामोद बिलावल' आणि 'बिहाग' यांच्याकडे जास्त. काही जण तर याला 'दिनकी बिहाग' असंही म्हणत. यात सारंगची 'म-रे' संगती नाही. चलन वेगळं, वादी-संवादी वेगळे, पण तरी तो गौड 'सारंग'च! याचं चलन वक्र आणि नृत्यातल्या डौलदार, लययुक्त, पदन्यासासारखं आहे. व्ही.डी. पलुस्करांनी 'पियु पलन लागी मोरी अखियाँ' ही रचना अजरामर केलीय. ग्वाल्हेरचे कृष्णराव शंकर पंडितही हा राग उत्कृष्ट गात. कुमार गंधर्वांची 'पिया बसेरा' ही स्वरचित बंदीश ग्रेटच आहे. 'गौड सारंग'मध्ये शुद्ध मल्हार मिसळून 'गौड मल्हार' कसा तयार होतो, याचं सुंदर विवेचनही कुमारांनी एकदा केलं होतं. रविशंकरांच्या 'गौड सारंग'मध्ये खर्जातलं सुरेख मींडकाम बघायला मिळेल. आग्रा घराण्याचे फैयाझ खाँसाहेब त्यांचे सासरे मेहबूब खाँ (दरस पिया) यांची 'बिना देख तोरे' ही चीज गायचे. भीमसेन आणि मल्लिकार्जुन यांची 'सैया मैं तो' हीपण एक उत्तम बंदीश आहे.

किशोरी आमोणकरांची 'कजरा रे' ही 'गौड सारंग'ची कॅसेट उत्कृष्टच आहे. या शिस्तबद्ध आणि आकृतीबद्ध गाण्यात लय कशी नाचत तुमकत येते, हे ऐकूनच अनुभवावं. पहिल्या रेकॉर्डिंगनंतर 'आपल्या मनासारखा गौड सारंग उतरला गेला नसल्याच्या' किशोरीताईंच्या बेचैनीमुळे जमवाजमव करून रेकॉर्डिंग कसं झालं, याचा गंमतशीर किस्सा शशांक कट्टीकडून ऐकल्याचंही आठवतंय. गौड सारंग ऐकला की, पुन्हा खानोलकरच आठवतात. दुपारी उंचसखल वाटेवर चालताना कुठेतरी डोंगर दिसावेत. या डोंगराच्या मागेपुढे कुणी भेटेल का, तिकडे झुळझुळणारा झरा असेल का, वळणावर झाड असेल का आणि रस्ता मिळेल का, अशी हूरहूर वाटावी, तसाच नागमोडी वळणाचा 'गौड सारंग' वाटतो. 'गौड सारंग'मध्ये आशा भोसलेंनी गायलेलं आणि श्रीनिवास खळे यांनी स्वरबद्ध केलेलं 'काल पाहिले मी स्वप्न गडे' हे गाणं आजही मनाला भावतं. अनिल विश्वासची 'ना दीर दिम ताना देरे ना', 'रितु आये, रितु जाये' आणि 'कुछ और जमाना कहता है' हीही गाणी ऐकावीत. ओ.पी. नय्यरनं १९५२ सालच्या आपल्या 'आसमान' या पहिल्या चित्रपटासाठी 'देखो जादू भरे मोरे नैना' हे गाणं दिलं होतं. ते याच रागात निघालं!

या सगळ्यात कहर म्हणजे 'अल्ला तेरो नाम...' हे गाणं तर अफलातूनच आहे. यातला आशावाद आणि मानवतावाद ऐकून, आताच्या हिंस्र आणि विध्वंसक जगात हे सगळं फक्त गाण्यातच राहणार का, असं वाटून प्रचंड बेचैन मात्र व्हायला होतं!

godbolemusic@yahoo.com